करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक
कमलाभवानी
वर्ष 34 वे
संदेश
www.saptahiksandesh.com

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.४९ | पाने-१२ | दि.२०/१२/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.

Shweta
Gift & Toys
श्वेता गिफ्ट ॲन्ड टाईज
लहान मुला-मुलींसाठी थार(जीप)
4 X 4 येथे उपलब्ध !
श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा. (9822058106)

हॉटेल
राजयोग
बायपास रोड, करमाळा., जि.सोलापूर.
व्हेज
● शुध्द शाकाहारी
● चायनीज
लॉन्स
मुंज, वाढदिवस, डोहाळे जेवण, साखरपुडा,
नामकरण सोहळा, गेट-टूगेदर, कंपनी पार्टीसाठी
सर्व सुविधा उपलब्ध..!
प्रोप्रा : राजेंद्र मोरे (मो.9503175444)

पुन्हा एकदा बिबट्या - ऐन सुगीच्या मोसमात शेतकऱ्यात घबराहट

प्रशासनाच्या निर्णयाकडे नागरीकांचे लक्ष

करमाळा : करमाळा तालुक्यात पुन्हा एकदा बिबट्याच्या बातम्याने शेतकरी परिवारात घबराहट निर्माण झाली आहे. सायंकाळी सात नंतर कोणीही घराच्या बाहेर पडत नाही. एका बाजुला तुरीची काढणी, दुसऱ्या बाजुला केळीची काढणी तर तिसरेकडे ज्वारी हुरड्यात येऊ लागली आहे. अशा स्थितीत बिबट्याच्या चर्चेने पिकाला पाणी देणे दुरापास्त झाले आहे. याबाबत प्रशासनाने तात्काळ निर्णय घेऊन वस्तुस्थिती जनतेसमोर मांडणे आवश्यक आहे. एवढेच नव्हेतर बिबट्याचा शोध घेऊन त्याला पकडणे आवश्यक आहे.

सन २०20 मध्ये बिबट्याने करमाळा तालुक्यात मोठा उच्छाद मांडला होता. ३ डिसेंबरला फुंदेवाडी येथे शेतकरी, ५ डिसेंबरला अंजनडोह येथे महिला तर ७ डिसेंबरला चिखलठाण येथे शेतकरी कुटूंबावर हल्ला करून तीन जणांचा बळी घेतला होता. १० डिसेंबरला सांगवी येथील महिलेवर हल्ला केला होता, परंतु पतीच्या धाडसाने या महिलेचे प्राण वाचले होते. १७ डिसेंबरला ऊस टोळीतील मुलीवर हल्ला केला होता, पण त्यानंतर प्रशासनाने या बिबट्यास मारण्याचे आदेश दिल्याने डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांनी सायंकाळच्या सुमारास पांडूरंग राखुंडे यांच्या केळीच्या शेतात बिटरगाव वांगी येथे फायर करून बिबट्यास मारले होते. तत्पुर्वी २०१८-१९ मध्ये उंदरगाव येथे बिबट्याला पिंजऱ्यात पकडले होते.

करमाळा तालुक्यात मांगी, वडगाव, हिवरवाडी, रावगाव, पोथरे या भागात बिबट्या फिरत असून त्याने गायी, वासरावर तसेच शेळ्यावर हल्ले केले आहेत. दररोज कोणाला ना कोणाला बिबट्या दिसत असल्याने शेतकऱ्यामधून घबराहट निर्माण झाली असून शेतीची कामे ठप्प झाली आहेत. त्यामुळे प्रशासनाने या बिबट्याचा बंदोबस्त करण्यात यावा; अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

॥ श्री गजानन प्रसन्न ॥ श्री कमलाभवानी प्रसन्न ॥ श्री भैरवनाथ प्रसन्न ॥
सस्नेह नमस्कार वि.वि. आमचे येथे श्रीहरी कृपेकरून
चि.विनायक
B.E.Mech.
कै.गणपत निवृत्ती पाखरे यांचे नातू व श्री.दत्तात्रय गणपत पाखरे
रा.उमरड, ता.करमाळा यांचे चिरंजीव
चि.सौ.कां.पुजा
B.com
कै.लक्ष्मीकांत बबन शिंदे रा.श्रीगोंदा, जि.अ.नगर यांची कन्या
यांचा शुभविवाह
मंगळवार, दि.२४/१२/२०२४ रोजी सायं. ५ वा. ५१ मि.
संपन्न होणार आहे. तरी याप्रसंगी
आपली उपस्थिती प्रार्थनीय
आहे..!

सस्नेह निमंत्रण
विवाहस्थळ
धर्मसंगीत मंगल कार्यालय
करमाळा-कर्जत रोड
करमाळा, जि.सोलापूर
आपले नम्र
श्री.दत्तात्रय गणपत पाखरे (पत्रकार)
श्री.तानाजी गणपत पाखरे (ग्रामविकास अधिकारी)
समस्त पाखरे परिवार, उमरड
टीप : सर्वांना निमंत्रण पत्रिका दिलेल्या आहेतच. नजरचुकीने कोणास निमंत्रण पत्रिका मिळाली नसल्यास हेच निमंत्रण समजून शुभकार्यास अगत्य येण्याचे करावे, ही नम्र विनंती !

प्रत्येक प्रसंग म्हणजे परीक्षा ... काळजीपुर्वक सामना करा ...
मग पहा आनंदच आनंदच....!

संपादकीय.......................................!

थोडा समजूतदारपणा ..!

शासकीय कामकाजात अडथळा... ७१ लाखाच्या अपहरणात जामीन मंजूर... आपल्या जेसीबीला भाडे मिळत नाही म्हणून दुसऱ्या जेसीबी मालकाला मारहाण...मोटारसायकल अपघातात चालकाचे निधन...विवाहितेच्या छळ प्रकरणी सहाजणावर गुन्हा दाखल.. फोटो टाकण्याची धमकी देवून विवाहितेवर अत्याचार..शासकिय जागेवर अतिक्रमण देवळाली व निमगाव (ह.) चे सरपंचाचे सदस्यत्व रद्द... माहेरावरून उसणे पैसे का आणत नाही म्हणून विवाहितेचा मोडला हात...शासमीय जागेवर अतिक्रमणाचा गुन्हा दाखल... सव्वातीन लाखाचे दागिणे चोरी... विवाहितेचा विनयभंग...

या आकाशवाणी/टि.व्ही. चॅनेलच्या राज्यातल्या बातम्या नाहीत तर या बातम्या आपल्या तालुक्यातील गेल्या पंधरा दिवसात सा. संदेश मध्ये छापून आलेल्या आहेत.थोडा विचार केला तर हे प्रसंग टाळता आले असते का..?

कारण नसताना अतिक्रमण करण्याची गरज होती का.. अधिकाऱ्याच्या विरूध्द जाण्याची गरज होती का..? एखाद्या पदावर राहून भ्रष्टाचर करणे योग्य आहे का..? मोटारसायकल अपघातात मरण येईल अशी गाडी वेगात चालवणे योग्य आहे का..?आपला धंदा होत नाही म्हणून दुसऱ्या व्यवसायीकाला मारहाण करण्याची गरज आहे, का..? पदाधिकाऱ्यांनी शासकीय जागेवर अतिक्रमण करणे योग्य आहे का..?उसणे पैसे दिले नाही म्हणून पत्नीचा हात मोडायचा ही कुठली रीत आहे, पैशासाठी सुनेचा छळ ही बाब योग्य आहे का..? आपल्या जवळ प्रवास तीन-चार लाखाचे दागिणे ठेवण्याची गरज आहे का..? जर असतील तर त्याची काळजी कोण घेणार..? घरात सुंदर पत्नी असताना, दुसऱ्या महिलेचा विनयभंग का..?

भावनेच्या भरात पाच मिनीटात एखादे कृत्य करायचे आणि संपुर्ण आयुष्य बरबाद करायचे का..? या प्रत्येक बातमीतील घटना ही कोणी लादलेली नाही तर ती स्वत:हून आपण स्विकारलेली आहे.याची शिक्षा म्हणजे बदनामी, मनस्ताप, आर्थिक नुकसान, नातेवाईकांना होणारा त्रास आणि भविष्याची बरबादी हे कोणी केले..? याशिवाय ज्या बातम्यांना प्रसिध्दी नाही पण त्या दैनंदिन घडत असतात....नवरा त्रास देतो, बायको माहेरी...सासू-सुनात कडाक्याचे भांडण सून माहेरी...सासरचे त्रासाला कंटाळून सून माहेरी... नवऱ्याचा बायकोवर संशय... बायकोचा नवऱ्यावर संशय..दोघात भांडणे पर्यायाने घटस्फेट...नवरा घरात वेळ देत नाही, बायको घरातल्यांचा आदर करत नाही,बायको व मुले एक होवून त्रास देतात, मुलगा व सून मिळून आईला त्रास देतात.. मुलगा व सून आई-वडीलांना सांभाळत नाही..मनासारखी साडी, दागिणे,ॲक्टीवा घेतली नाही विवाहिता माहेरी..अशा बातम्यांना वृतपत्रात प्रसिध्दी नसते पण चर्चा जोरात असते.शेजारच्या सासू-सुनांची भांडणे ऐकायला तर अनेकजण टपून असतात. नवरा-बायकोचा वाद, त्यातून होणारी भांडणे, त्यानंतर शेजारचे तत्वज्ञान सांगायला येतात आणि त्यांच्या घरात पुन्हा दोनच दिवसात असा खेळ, माणूस अंगावर कपडे नसेलतर तो फाटके-तुटके कपडे घालून मजेत जगू शकतो, खायला पुरेसे अन्न नसेल तर तो उपाशी राहून जगतो पण जर त्याच्यावर मानसीक आघात होत असेल तर मात्र त्याला जगणे कठीण जाते. नको ते जगणे असा विचार केला जातो.साडी, दागिणे, गाडी म्हणजे संसार नसतो. त्यातून मोडलेला संसार कधी उभा रहात नाही. संसारात संशयाचा गतीरोधक आला तर संसाराची गाडी पुढे जावू शकत नाही, ती तिथेच रोखली जाते.जी माणसं आपली आहेत,आपली म्हणून सर्वस्व देण्यास तयार असतात त्यांच्याबाबत अविश्वास दाखवला तर त्यांना खूप मनस्ताप होतो आणि ते त्यातून घर सोडून जातात. जेंव्हा खरे कळते तेंव्हा खूप वेळ गेलेला असतो.सासू-सून किंवा आई-वडील यांच्या बरोबर भांडण हा विषय म्हणजे शुध्द मुर्खपणा आहे. सासूला तीचे महत्व राखण्यासाठी अथवा सुनेला ताब्यात ठेवण्यासाठी तीच्या चुका शोधून भांडते तर सून माझ्यावर अन्याय होतो म्हणून भांडते, ज्यांनी सर्वस्व देवून मुलाला मोठे केले त्याच्यावर आपला हक्क आहे, त्यांने आम्ही म्हणू ते ऐकलेच पाहिजे असे आई-वडीलांना वाटते तर मुलांना-सुनांना असे वाटते की आम्ही आज कमवतो, आम्ही शिकलो-सवरलो आम्हाला कळत नाही का..? या समज-गैरसमजातून घरा-घरात वाद सुरू आहेत. खरंच हे वाद महत्वाचे आहेत का..? हे वाद टाळू शकतो का..? याचा विचार केलातरी हे प्रश्न सुटू शकतात पण हे प्रश्न आपणाला सोडवण्याची इच्छा नाही असे वाटते व त्यामुळे शुल्लक गोष्ट वर्ष-वर्ष चघळली जाते व त्याच त्या मुद्यावरून दरदरोज वाद सुरू असतात.

आणखी एक टप्पा म्हणजे दारू पिल्याने लिव्हर ला सूज दवाखान्यात ॲडमीट, गुटखा खाल्ल्याने तोंडाचा कॅन्सर, सिगारेट मुळे श्वसननलीकेचा कॅन्सर,तंबाखूने अकरमात झटका,मटक्यात-जुगारीत सर्व प्रॉपर्टी गेली, दारूत संसार बुडाला,सावकाराने इस्टेट लुबाडली,चोराने घरातले दोन लाखाचे दागिणे व तीन लाख रूपये लुटले... अशा घटना वारंवार घडत असतात. खरं सांगा व्यसन करणे गरजेचेच आहे का..? कधी तरी विचार करा की हे आपल्याला जडले कसे..आणि ते सोडता येईल का..? असा विचार आला तरी निम्मे व्यसन कमी होते पण आपण त्याचा कधी विचारच करत नाही. ज्यातून सर्वस्व बरबाद होते व यापुर्वीचा अनेकांचा अनुभव असतानाही पुन्हा पुन्हा नवीन लोक त्यात का पडतात ..?दारू विक्रेता, सावकार, मटका एजन्ट, जुगारीचे आड्डे घरात होत नाही, तर आपण त्यांच्याकडे जातो. सावकाराकडे जमीन गहाण का टाका..? एक तर पर्याय निवडा, खर्चाचे काम पुढे ढकला नाहीतर सरळ बाजारभावात गरजे एवढी जमीन विका पण थोड्या लाभासाठी आपण सर्वस्व संपवून टाकतो. स्वत:चा व्यवहार जर स्वत:ला समजत नसेल तर जगण्यात मज्जा काय..?

जगताला प्रत्येक माणूस हा सुखासाठी जगत असतो, त्यासाठी त्याची धडपड सुरू असते. असे असूनही सुख त्याच्याकडे येण्यासाठी धडपड करत असताना तो मात्र अशा भावनिक प्रसंगातून सुखाला स्वत:हून लाथाडतो असे दिसते.जीवनात दोन प्रकारची संकटे असतात एक नैसर्गिक व दुसरे स्वनिर्मित.दुष्काळ नैसर्गिक संकट आहे , त्यात आपण काही करू शकत नाही पण वर ज्या घटनातून दु:ख निर्माण झालेले आहे ते आपण नक्कीच टाळू शकतो.जगासाठी नाही, किमान स्वत:साठी, स्वत:च्या भविष्यासाठी, स्वत:च्या आयुष्यासाठी हे टाळता आले तर ...!असा विचार करून वागण्यात बदल केलातर नक्कीच स्वत:ला स्वत: न्याय देतो असे मान्य करता येईल व त्यातून सुखाची प्राप्ती होईल.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री

डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड अँन्ड हार्डवेअर
- प्लायवुड
- किचनट्रॉली
- वॉलपेपर
- हार्डवेअर
- फेव्हिकॉल
- वुडन प्लोरिंग
- सनमायका

प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धेत श्रीदेवीचामाळ जि.प.शाळा प्रथम

करमाळा(सं.प्र.): जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धेत श्रीदेवीचामाळ येथील जि.प.प्राथमिक शाळेने यावर्षी प्रथम क्रमांक पटकाविला या लोकनृत्य स्पर्धेत शाळेच्या वतीने एकूण १२ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. मागील वर्षी टॅलेंट हंट स्पर्धेत श्रीदेवीचामाळ शाळेने वक्तृत्व, कथाकथन, चित्रकला, निबंध व समुह नृत्य स्पर्धेत तालुका स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले होते. स्पर्धकांना मुख्याध्यापिका अंजली निमकर, उपमुख्याध्यापिका शितल बिरंगळ, सहशिक्षक हरिश कडू, जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थी, शिक्षकांचे अभिनंदन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रविण हिरगुडे, उपाध्यक्षा सुनिता ननवरे व सदस्य यांनी केले.

जयप्रकाश बिले पब्लिक स्कुलमध्ये स्टूडंट्स लीड कॉन्फरन्स

करमाळा(सं.प्र.): झरे येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कुलच्या वतीने उत्साही वातावरणात लीड स्टूडंट्स कॉन्फरन्सचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आधुनिक युगातील विविध प्रकारची मॉडेल्स, आदित्य सूर्ययान, रोबोट, महिला अंतराळवीर सुनिता विल्यम आणि आकर्षक कलाकृती सादर केली होती. या कार्यक्रमास ज्योती मुथा, डॉ.स्वाती घाडगे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयप्रकाश बिले, संचालिका स्वाती बिले यांचेसह मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, कर्मचारी व पालक वर्ग उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन धनश्री साने यांनी केले.

स्वातंत्र्य सैनिक मनोहरपंत चिवटे मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, करमाळा.

पाहिजेत

संवेदनशील उपमुख्यमंत्री **मा.श्री.एकनाथजी शिंदे**, तरूण तडफदार खासदार **डॉ.श्रीकांत शिंदे**, शिवसेना वैद्यकिय मदत कक्ष प्रमुख तथा मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता कक्षाचे माजी कक्ष प्रमुख **श्री.मंगेश नरसिंह चिवटे** यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू होत असलेल्या करमाळा येथील स्वातंत्र्य सैनिक मनोहरपंत चिवटे मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल येथे खालीलप्रमाणे जागा भरणे आहेत.

क्र.	पदाचे नाव	पदसंख्या	अनुभव	क्र.	पदाचे नाव	पदसंख्या
1	M.B.B.S.	1	ICU Experience	7	Lab Technician	3
2	B.A.M.S.	3		8	X-Ray Technician	1
3	B.H.M.S.	3		9	Pharmacist	1
4	Staff Nurse	3		10	PRO	1
5	Brothers	3	ICU, Ward Experience	11	Wardboy	2
				12	Maushi	4
6	Billing Receptionist Staff	1	Computer Knowledge	13	Ambhulance Driver	1
				14	Lift Opperator	1

• मुलाखत : सोमवार दि.२३/१२/२०२४ •
तरी उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक कागदपत्रासहीत उपस्थित रहावे..!

मुलाखतीचे ठिकाण : स्वातंत्र्यसैनिक मनोहरपंत चिवटे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, अमरनाथ टावर, श्रीदेवीचामाळ रोड, करमाळा.

संपर्क
चेअरमन
महेश नरसिंह चिवटे (पत्रकार)
जिल्हाप्रमुख, शिवसेना
मो.9423333881

सचिव
दिपक रामलिंग पाटणे
मो.7972199191

डॉ.महेंद्र ढमाळ
मो.9823113213
डॉ.मनीषा ढमाळ

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !
सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या MRP वर भरघोस डिस्काउंट
रोगप्रतिकारक क्षमता, मेंदूची स्मरणशक्ती वाढविण्यासाठी आणि निरोगी बनण्यासाठी उपयुक्त असलेले उच्चप्रतीचे
ड्रायफ्रुट्स
हेल्दी ड्रायफ्रुट्स व सीड्स फ्रेश स्टॉक उपलब्ध !
- काजू । बदाम । मनुके
- पिस्ता । चारोळी । केशर
- मामरा बदाम । अंजीर अक्रोड
- आख्खा अक्रोड । लाल खजूर
- काळी खजूर । सिडलेस खजूर
- कलमी खजूर । आजवा खजूर
- आवळा कॅन्डी । काळे मनुके
- मिक्स ड्रायफ्रूट । मोरावळा
- मखाना । फ्लेवर मखाना
- खारीक । काळी खारीक
- खोबरे । डिंक । धावड्या डिंक
- गावरान गाई व म्हशीचे तूप
- पिवळी व काळी खारीक पावडर
- जर्दाळू । बदाम व पिस्ता स्लाईस
- खारा पिस्ता । खारा बदाम
- खारा काजू । मसाला काजू
- ड्राय किवी । मिक्स ड्राईड फ्रुट्स
- ड्राय मोसंबी । ड्राय पायनापल
- ड्राय स्ट्रॉबेरी । ड्राय मँगो
- ड्राय ब्ल्यूबेरी । ड्राय रासबेरी
- पमकीन सीड्स । रोस्टेड मिक्स सीड्स

*टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !
॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
एव्हरफ्रेश सुपरमार्ट
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥
*नियम व अटी लागू
किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन अॅन्ड स्वीटस् । बेकरी अॅन्ड मिल्क प्रॉ
नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम अॅन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य
पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

उद्योजकांनी भुखंडासाठी ऑनलाईन अर्ज करावेत : महेश चिवटे

करमाळा(सं.प्र.) : छोटे छोटे भुखंड उपलब्ध व्हावे, या मागणीसाठी आपण विशेष प्रयत्न केले असून उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या माध्यमातून करमाळा एमआयडीसी मधील पाच-पाच गुंठ्याचे दहा भुखंड उद्योजकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले असून इच्छुकांनी ऑनलाईन अर्ज करावे; असे आवाहन शिवसेने चे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी केले.

यापूर्वी करमाळा एमआयडीसी मध्ये दोन एकर, पाच एकर, दहा एकर अशी भूखंड होते. त्याचे छोटे-छोटे भूखंड करावेत; अशी मागणी होती. यामुळे उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या आदेशानूसार पाच ते सहा गुंठ्याचे ९० प्लॉट उपलब्ध करण्यात आले आहे. यापैकी पहिले दहा प्लॉट वितरणासाठी उपलब्ध केले असून २३ डिसेंबर पासून ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू होणार आहे. ज्या उद्योजकांना हे प्लॉट घ्यायचे आहेत, त्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी शिवसेना कार्यालयाशी संपर्क साधावा; असेही आवाहन चिवटे यांनी केले आहे.

दहा भुखंडाचे वाटप झाल्यानंतर ६० ते ७० भुखंड वाटपासाठी तयार असून तेही तात्काळ एक वर्षभरात सर्व उद्योजकांना देण्यात येतील. याशिवाय तात्पुरती पाणीपुरवठा योजना करण्यासाठी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी चार कोटी रूपये मंजूर केले असून याचेही काम लवकर सुरू होईल; असे एमआयडीसीच्या विभागीय संचालिका बिरजे यांनी दिली.

उद्योगमंत्री उदय सामंत यांनी गेली २५ वर्षापासून रखडलेला करमाळा एमआयडीसीचा प्रश्न सोडवल्याबद्दल उद्योगमंत्री उदय सामंत यांचा सत्कार करण्यासाठी करमाळ्यातील नव उद्योजकांचे शिष्टमंडळ लवकरच मुंबईला जाऊन ना.सामंत यांचा सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती उद्योजक फुलकुमार शहा यांनी दिली.

देवराई ग्रुपच्या अध्यक्ष पदी ॲड.बिभिषण सोरटे

करमाळा(सं.प्र.) : श्रीदेवीचामाळ येथील खंडोबाा मंदिर परिसरात वृक्ष लागवड व विविध उपक्रमासाठी देवराई ग्रुपची स्थापना करण्यात आली आहे. या देवराई ग्रुपच्या अध्यक्ष पदी ॲड.बिभिषण सोरटे यांची सुर्वानुमते निवड करण्यात आलेली आहे. या परिसरात देवराई ग्रुपच्या वतीने ५०० वृक्षाची लागवड करण्यात आली असून, हे वृक्ष आता १५ ते २० फूट उंच झालेले आहेत. या ठिकाणी आणखीन वृक्ष लागवड करून एक हजार वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट आपण पूर्ण करणार असल्याचे ॲड.सोरटे यांनी सांगितले आहे. या परिसरात लहान मुलांसाठी घसरगुंडी, युवकांना डबलबार व अन्य खेळणी उभारण्याचा मानस असल्याचेही सोरटे यांनी सांगितले आहे.

डी.जी.पाटील माध्य व उच्च माध्य. विद्यालय
संगोबा रोड, धायखिंडी, ता.करमाळा, जि.सोलापूर

शिक्षक पाहिजेत

क्र.	पदाचे नाव	विषय	रिक्त पदे	शैक्षणिक पात्रता	अनुभव
१	सहशिक्षक	गणित	२	B.sc./M.sc., B.ed	२ वर्षे
२	सहशिक्षक	मराठी	३	B.A./M.A., B.ed	२ वषे
३	सहशिक्षक	हिंदी	३	B.A./M.A., B.ed	२ वर्षे
४	सहशिक्षक	इंग्रजी	३	B.A./M.A., B.ed	२ वर्षे
५	सहशिक्षक	इतिहास/भुगोल	२	B.A./M.A., B.ed	२ वर्षे
६	सहशिक्षक	-	२	डी.एड.	२ वर्षे
७	सहशिक्षक	विज्ञान	२	B.sc/M.sc., B.ed	२ वर्षे
८	शिपाई	-	२	१० वी	२ वर्षे

टीप : १) सर्व उमेदवारांनी येताना ओरिजनल कागदपत्रे व सोबत झेरॉक्स कॉपी घेवून येणे.
२) मुलाखती वेळेत घेतल्या जातील.
३) जे उमेदवार वेळेत येणार नाही त्यांची मुलाखत घेतली जाणार नाही.
४) मुलाखती दिवशी एक डेमो पाठ घ्यावा लागणार असल्याने त्यासंबंधी तयारी करून येणे.
उमेदवाराला अनुभव व त्याच्या शिक्षणानूसार पगार दिला जाईल.

मुलाखत : दि.२६/१२/२०२४ व २७/१२/२०२४, वेळ : सकाळी १० ते दुपारी ३ पर्यंत
ठिकाण : डी.जी.पाटील माध्य व उच्च माध्य विद्यालय, संगोबा रोड, धायखिंडी, ता.करमाळा.
संपर्क : मो.9607210033, 7276676770

समर्थ बालरूग्णालय स्त्रीरोग व प्रसुतीगृह

डॉ.वृषाली अभिजित हंकारे (M.B.B.S. D.G.O)
डॉ.उदयसिंह नामदेव गायकवाड (M.B.B.S. D.C.H)

उपलब्ध सुविधा.. ● गरोदर माता तपासणी व उपचार ● सुसज्ज प्रसुतीगृह व ऑपरेशन थिएटर ● नॉर्मल आणि अति जोखमीची बाळंतपणे ● मासिक पाळीचे आजार निदान व उपचार ● वंध्यत्व निवारण ● सिझेरियन प्रसुती ● गर्भशयाचे आजार निदान व उपचार ● मेनोपॉज क्लिनिक

महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत गरीब व गरजू रूग्णांसाठी ठराविक गंभीर आजारावर मोफत उपचार (MJPJAY)

● नवजात अर्भक अतिदक्षता विभाग (NICU) ● व्हेंटिलेंटरची सोय
● बालरोग अतिदक्षता विभाग (PICU) ● CPAP ● Pulsoximeter
● दररोज लसीकरण सुविधा (Vaccination) ● वाफेची सोय (Nebulizer)
● बाल दमा निदान व उपचार ● सेंट्रल ऑक्सिजनची सोय ● 02 Concentrator

गायकवाड चौक, करमाळा. (०२१८२-२२००५७, ९१४६४३०५५०)

भगवंत पवार यांना वैद्यकिय परीक्षेत गोल्ड मेडल

करमाळा(सं.प्र.) : वडशिवणे येथील ह.भ.प.गणेश पवार यांचे चिरंजीव भगवंत पवार यांना वैद्यकिय परीक्षेतील जनरल सर्जरी विषयात गोल्ड मेडल मिळाले आहे. या यशाबद्दल तालुक्यातील मान्यवरांनी डॉ.भगंवत पवार यांचे विशेष अभिनंदन केले आहे. भगवंत पवार यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण वडशिवणे येथे झाले. त्यानंतर अकरावी व बारावी सोनवणे कॉलेज उक्कडगाव येथे झाले. त्यानंतर त्यांना वैद्यकिय शिक्षणासाठी एम्स् हैद्राबाद येथे प्रवेश मिळाला. तेथे पहिल्या वर्षी तीन गोल्ड मेडल तर दुसऱ्या वर्षी ब्रांझ मेडल मिळवत अंतिम परीक्षेत सर्व विषयामध्ये विशेष प्राविण्य मिळवले आहे. मराठी माध्यमातून शिक्षण घेत गुणवत्ता मिळवल्याने त्यांना कोणत्याही प्रकारे शुल्क न भरता केवळ ५८५६ रूपयात वसतिगृहासह शिक्षण मिळाले आहे. त्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल तालुक्यातील सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी विशेष अभिनंदन केले आहे.
भगवंत पवार हे या परिसरातील पहिले एमबीबीएस डॉक्टर आहेत.

सर्व सोयीसुविधायुक्त ५४० स्क्वे.फूटचा
हॉल भाड्याने देणे आहे
रिटेल, ऑफिस, शैक्षणिक संस्था किंवा शिकवणीसाठी हॉल
सुविधा...
● प्रकाशमय व हवेशीर हॉल ● शांत वातावरण
● शौचालय व बाथरूमची सोय ● प्रशस्त बाल्कनी
संपर्क : 9423790613, 8600404212
पत्ता : महेंद्रनगर, सागर टॉकीजच्या मागे, करमाळा.

स्व.सपकाळ व नायकुडे गुरूजी यांचे कार्य प्रेरणादायी : फुले महाराज

करमाळा(सं.प्र.): स्व.नामदेव बापू सपकाळ व आदिनाथ नायकुडे गुरूजी यांचे कार्य आधुनिक पिढीसाठी प्रेरणादायी असून त्यांचे कार्य हे दीपस्तंभासारखे आहे; असे प्रतिपादन ज्ञानदेव फुले महाराज यांनी केले.

सालसे येथील न्यू यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लालबहाद्दुर शास्त्री विद्यालयाच्या प्रांगणात संस्थापक स्व.नामदेव बापू सपकाळ व तत्कालीन सचिव आदिनाथ नायकुडे गुरूजी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित व्याख्यान कार्यक्रमात फुले महाराज बोलत होते. यावेळी उद्योजक नितीन सपकाळ, अध्यक्ष प्रकाश सपकाळ, उपाध्यक्ष व मुख्याध्यापिका मनिषा तनपुरे, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष तानाजी लोकरे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष वैभव घाडगे, संस्था संचालक अनिल घाडगे, सविता लोकरे, निशा सपकाळ, माया गोमे, लिला जाधव, सुरेखा ढेरे, सुजाता जगदाळे, तसेच शरद पवार, जालिंदर शिंदे, मेजर गोमे, भारत सपकाळ, संदीप सपकाळ, सेवानिवृत्त शिक्षक मच्छिंद्र घाडगे, पोलीस पाटील पवार, बाळासाहेब घाडगे यांचेसह ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी पुण्यतिथीनिमित्त आयोजित विविध स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व मेडल देण्यात आले. सुत्रसंचानल सातपुते यांनी केले तर उपस्थितांचे आभार घाडगे यांनी मानले.

तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत मारकड वस्ती शाळेचे यश

करमाळा(सं.प्र.) : यशाच्या शिखरावर पोहोचायचे असेलतर जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनतीच्या जोरावर यश सुध्दा खेचून आणता येते. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे केम येथे झालेल्या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मारकड वस्ती केंद्र चिखलठाण या शाळेतील मुलींच्या संघाने लहान गटात अंतिम सामन्यात हिवरवाडी संघावर दणदणीत विजय मिळवला आहे. या यशाने मारकड वस्ती शाळेतील मुलींचा संघ जिल्हास्तरीय स्पर्धेस पात्र ठरला आहे.

अतिशय चुरशीच्या झालेल्या सामन्यामध्ये मारकड वस्ती शाळेने सहा गुणांनी विजय मिळवत विजयश्री खेचून आणली. कमी पटसंख्या असताना देखील शांत संयमी खेळ करत समोरच्या संघावर यशस्वीपणे मात केली. यशस्वी संघाचे व मुख्याध्यापक/मार्गदर्शक शिक्षक तात्यासाहेब जगताप, सहशिक्षिका स्वाती जगताप यांचे अभिनंदन गटशिक्षणाधिकारी जयवंत नलवडे, विस्तार अधिकारी नितीन कदम, मिनीनाथ टकले, केंद्रप्रमुख वंदना पांडव, रमाकांत गटकळ, लक्ष्मण भंडारे, सरपंच विकास गलांडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश मारकड, सर्व पालक यांनी केले.

महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामूक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !
२ चाकी ३ चाकी ४ चाकी ट्रक ट्रॅक्टर JCB पोक्लेन सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) ☎ 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) ☎ 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

खुशखबर खुशखबर
मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको औरंगाबाद(२०८ किमी), नको मिरज (२३० किमी), आता आपल्या करमाळा (१/२ किमी) शहरात
डॉ.लोकरे हॉस्पिटल मध्ये सोमवार व गुरूवारी उपलब्ध
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
उपलब्ध सुविधा...
● मुळव्याधवर इंजेक्शन ● डिलीव्हरीनंतर उद्‌भवारे कोंब ● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्‌भवणारे कोंब ● संडासवाटे रक्त येणे, पु येणे ● संडासची जागा बाहेर पडणे ● संडास जागी खाज व आग होणे ● संडासाचा नागवेडा ● संडास नंतर बसण्यास त्रास होणे ● भगंदर, फिशर ● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड
करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई
ओपीडीचे वैशिष्ट्ये...
● इंजेक्शन सुविधा ● लेझर सुविधा
● प्रभावी औषधी सुविधा ● मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग
● मेडिक्लेम सुविधा उपलब्ध ● पार्किंगची व्यवस्था
● आठवड्यातून दोनदा ओपीडी
विशेष सुचना... १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
नाव नोंदणीसाठी संपर्क मो.9763035862
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

माजी सरपंच वनमाला सुरवसे यांचे निधन

करमाळा(सं.प्र.): भोसे येथील माजी सरपंच वनमाला भोजराज सुरवसे (वय-५५) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने जामखेड येथे निधन झाले आहे. २० डिसेंबरला रात्री साडेआठच्या सुमारास भोसे येथे त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. सौ.सुरवसे या जामखेड येथे नातेवाईक आजारी असल्याने भेटण्यासाठी गेल्या होत्या. तेथेच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने दवाखान्यात जाईपर्यंत त्यांचे निधन झाले. त्यांच्या जाण्याने पती भोसे येथील माजी सरपंच भोजराज सुरवसे यांना धक्का बसला आहे. त्यांच्या मागे पती, एक मुलगा, चार मुली असा परिवार आहे. अतिशय संयमी व मायाळू स्वभावाच्या वनमाला सुरवसे यांच्या निधनाने भोसे ग्रामस्थांवर दु:खाची छाया पसरली आहे. ॲड.राहुल सावंत व सीए लहू काळे यांच्या त्या सासू होत्या. अंत्यविधी प्रसंगी सर्व क्षेत्रातील नागरीक उपस्थित होते.

सत्यभामा वसंतराव देशमुख यांचे वृध्दपकाळाने निधन

करमाळा(सं.प्र.): येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील सेवानिवृत्त वरीष्ठ लिपिक कैलास देशमुख यांच्या मातोश्री सत्यभामा वसंतराव देशमुख (वय-७५) यांचे नुकतेच वृध्दपकाळाने निधन झाले. टेंभूर्णी येथे त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अंत्यविधीप्रसंगी सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते.

घर विकणे आहे
करमाळा शहरातील किल्लाविभाग येथील सर्व सोयीनेयुक्त असलेली घरजागा (हॉल, किचन व वरती एक हॉल) योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे.
संपर्क : मो.9657750113

साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्
सर्व प्रकारचे स्टील रेलींग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.
प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
● बिल्डींग मटेरियल सप्लायर्स ● प्लंबींग ● हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ताः बायपास रोड, जेऊर.

ग्रामीण कुटूंब व्यवस्था हा शेतीचा मुख्य आधार : ॲड.डॉ.बाबुराव हिरडे

करमाळा(सं.प्र.): ग्रामीण कुटूंब व्यवस्था हा शेतीचा मुख्य आधार असून ही कुटूंबव्यवस्था जपली तर त्या कुटूंबाची शेतीमध्ये प्रगती होते; असे प्रतिपादन ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार ॲड.डॉ.बाबूराव हिरडे यांनी केले.

शेटफळ येथील वैभव पोळ यांच्या तालुक्यातील पहिल्या शेतकरी मॉलच्या उद्घाटनानिमित्त लोकविकास फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या वतीने आयोजित शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर तहसीलदार शिल्पा ठोकडे, धाराशिव जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनोज राऊत, युनियन बँकेचे विभागीय प्रबंधक अतुल शेंडे, यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, जैन इरिगेशनचे विभागीय व्यवस्थापक संतोष डांगे, मंडल कृषी अधिकारी मधुकर मारकड आदी प्रमुख पाहुणे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नागराज मशिनरी व शेतकरी मॉलचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले.

पुढे बोलताना ॲड.हिरडे म्हणाले, की शेती करताना कुटूंबातील एकमेकांच्या मतांचा आदर केला पाहिजे. शेतकरी अल्पशिक्षित असलातरी कष्ट करण्याची तयारी, जिद्द आणि चिकाटी असेलतर कोणत्याही क्षेत्रामध्ये यश मिळते; हे शेटफळ येथील वैभव पोळ यांचे उदाहरण असून त्यांचा आदर्श इतरांनी घेण्याची गरज आहे.

यावेळी तहसीलदार ठोकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राऊत, यशकल्याणीचे करे-पाटील, जैन इरिगेशनचे डांगे यांनी शेटफळ येथील गटशेतीच्या प्रयोगाचे कौतूक करून शेतीमध्ये धोरणात्मक अमुलाग्र बदल करण्याची गरज असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक लोकविकास शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष वैभव पोल यांनी केले. सुत्रसंचालन पत्रकार गजेंद्र पोळ यांनी केले तर आभार प्रशांत नाईकनवरे यांनी मानले. या कार्यक्रमास लोकविकास डेअरीचे दिपक देशमुख, विठ्ठल पाटील महाराज, युनियन बँकेचे शाखाधिकारी मोहन कोरडे, जिल्हापरिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, माजी सरपंच चंद्रकांत सरडे, आण्णासाहेब जगताप विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील जाधव, आदिनाथचे माजी संचालक धुळा कोकरे, रामभाऊ पवार, किरण पोळ, दादासाहेब लबडे, सरपंच पांडूरंग लबडे, अनिल पोळ, विलास लबडे, तलाठी ईश्वर कदम, ग्रामसेवक सचिन सरडे, नानासाहेब साळुंके, विजय लबडे, राजेंद्र साबळे, कृषी पर्यवेक्षक शिवाजी तळेकर, कृषी सहाय्यक सुप्रिया शेलार यांचेसह ग्रामस्थ व परिसरातील शेतकरी उपस्थित होते. यावेळी केळी, उस, भाजीपाला व विविध पिकांमध्ये भरघोस उत्पादन घेणारे आणि कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेले सचिन गव्हाणे, सचिन सरडे, आदिनाथ राऊत (चिखलठाण नं.१), वैभव बोरेडे (केडगाव), संतोष नाईकनवरे (शेटफळ), भाऊसाहेब राखुंडे (सोगाव पूर्व), किशोर रिटे (रिटेवाडी), महादेव काळोखे (उमरड), शिवाजी साखरे (राजुरी), सुदाम रणदिवे (सरपडोह) यांचा सन्मान करण्यात आला.

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

कै.युवराज(धनुभैय्या) सुरेश किरवे

मनी होता साधेपणा, कधी न दाखवला मोठेपणा
चेहरा होता हसरा, जसा माणुसकीचा झरा
उरली नाही साथ आम्हाला
आठवण येते क्षणाक्षणाला..!

कै.युवराज(धनुभैय्या) सुरेश किरवे

यांचे हृदयविकाराच्या झटक्याने नुकतेच निधन झाले. त्यांच्या कुटूंबियाच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो; हीच आमची भावपूर्ण श्रध्दांजली !

शोकाकुल

गजानन स्पोर्टस् & सोशल क्लब

वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर

महाराष्ट्र शासन
मुख्यमंत्री

भाजपा प्रदेश उपाध्यक्षा व बागल गटाच्या नेत्या रश्मी(दिदी) बागल यांनी नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच करमाळा तालुक्यातील विविध विकासकामांचे निवेदन दिले.

विधानपरिषदेच्या सभापती पदी कर्जत-जामखेडचे माजी आमदार श्री.राम शिंदे यांची निवड झाल्यानंतर त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना आमदार नारायण(आबा) पाटील व इतर मान्यवर

विठाई

मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल

करमाळा., जि.सोलापूर

आता करमाळकरांच्या सेवेत
24 तास उपलब्ध

मुंबई येथील **Dr. R.N. Cooper Hospital**
येथे पूर्वी कार्यरत असलेले सुप्रसिद्ध तज्ञ डॉक्टर

डॉ. अजयकुमार अनंत तोरड

Consulting Physician, Diabetologist, Cardiologist, Rheumatologist,
ICU Intensivist, MBBS, FCPS (Gen. Medicine)

भव्य उद्घाटन सोहळा

दि.२३/१२/२०२४ रोजी सकाळी ९ वा. ५५ मि.

उपचार

हृदयरोग, मधुमेह उपचार, मेंदूचे आजार,
हार्टअटॅक, सर्पदंश, विषबाधा, अर्धांगवायू

- थायरॉईड.
- दमा, टी.बी व फुफूसाचे आजार.
- किडनी आणि लिव्हर चे आजार.
- पोट आणि आतड्याचे विकार,
- कावीळ.
- डोकेदुखी आणि मेंदूचे विकार.
- संधिवात.
- ॲनिमिया (रक्तक्षय)
- साथीचे आजार -
  - मलेरिया.
  - डेंग्यू.
  - चिकनगुनिया.
  - टायफाईड.

उपलब्ध सुविधा

- 12 बेड चे सुसज्ज ICU.
- 2 डी इको.
- व्हेंटिलेटर आणि सेंट्रल ऑक्सीजनची सोय.
- X-RAY.
- आपत्कालीन विभाग (इमर्जन्सी).
- ऑपरेशन थिएटर.
- डिलक्स रुम्स.
- जनरल वॉर्ड.
- 24 X 7 मेडिकल.
- पथोलॉजी लॅब.

24 HOURS

विठाई मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल, करमाळा
कमलादेवी रोड, युनियन बँक जवळ, शाहूनगर, करमाळा-413203

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...

जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स् पोंधवडी, ता.करमाळा.

- **नेपाळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी) वाराणसी, गोरखपूर, प्रयागराज, काठमांडू, मनोकामना, लुंबिनी, अयोध्या, पोखरा
- **काशी दर्शन** काशी, गया, आयोध्या, प्रयाग
- **गुजरात दर्शन** गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ नागेश्वर ज्योर्तिलिंग, द्वारकाधाम, अक्षरधाम, स्टेयु ऑफ युनिटी, सरदार वल्लभभाई पटेल पुतळा
  कालावधी : दि.३/१/२०२५ ते ११/१/२०२५
  सहल खर्च : रू.१४,०००
- **कन्याकुमारी दर्शन** कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी
  कालावधी : दि.१६/१/२०२५ ते २६/१/२०२५
  सहल खर्च : रू.१३,८००
- **गंगासागर दर्शन** गंगासागर, कोलकत्ता, जगन्नाथ पुरी भुवनेश्वर, कोणार्क, साक्षी गोपाळ
  कालावधी : दि.३०/१/२०२५ ते ७/२/२०२५
  सहल खर्च : रू.१२,८००
- **केरळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी) कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, मुन्नार त्रिवेंद्रम, कन्याकुमारी, मधुराई, रामेश्वरम्
  कालावधी : दि.११/२/२०२५ ते २३/२/२०२५
  सहल खर्च : रू.३१,५००
- **वैष्णोदेवी, कार्श्मिर, अमृतसर दर्शन** माता वैष्णोदेवी, श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग, पेहलगाम, अमृतसर इ.
  कालावधी : दि.२८/२/२०२५ ते १३/३/२०२५
  सहल खर्च रू.२६,०००
- **वैष्णोदेवी दर्शन** माता वैष्णोदेवी, शिवखोरी, जम्मू अमृतसर, अटारी बॉर्डर, दिल्ली
  कालावधी : दि.९/३/२०२५ ते १७/३/२०२५
  सहल खर्च : रू.१३,८००
- **मथुरा दर्शन** मथुरा, आग्रा, गोकुळ, वृंदावन, बरसाना, गोवर्धन पर्वत, नंदगाव
  कालावधी : दि.२२/३/२०२५ ते २८/३/२०२५
  सहल खर्च : रू.९,१००

● रेल्वे प्रवास ● बस प्रवास
● भोजन व्यवस्था ● राहण्याची उत्तम सोय

बुकींग सुरू

संपर्क
श्री.मयुर राऊत
मो.८८८८३३३६३८ / ८६९८३३३६३८

विठाई मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटलचा २३ डिसेंबरला उद्घाटन सोहळा

करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरात कमलादेवी रोडलगत, युनियन बँकेजवळ, शाहुनगर येथे नव्याने सुरू होणाऱ्या विठाई मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटलचा भव्य उद्घाटन सोहळा २३ डिसेंबर रोजी सकाळी ९ वा.५५ मि. होणार आहे.

विठाई मल्टी-स्पेशालिटी हॉस्पीटल हे करमाळेकरांच्या सेवेत २४ तास उपलब्ध राहणार असून मुंबई येथील डॉ.आर.एन.कॉर्पर हॉस्पिटलमध्ये पूर्वी कार्यरत असलेले सुप्रसिध्द तज्ञ डॉक्टर डॉ.अजयकुमार अनंत तोरड हे रूग्णावर उपचार करणार आहेत. या मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये हृदयरोग, मधुमेह उपचार, मेंदूचे उपचार, हार्टअटॅक, सर्पदंश, विषबाधा, अर्धांगवायू तसेच थायरॉईट., दमा, टीबी व फुफ्फुसाचे आजार, किडनी आणि लिव्हर चे आजार, पोट आणि आतड्याचे विकार, कावीळ तसेच डोकेदुखी आणि मेंदूचे विकार, संधिवात तसेच साथीचे आजार मलेरिया, डेग्यू, चिकनगुनिया, टायफाईड आदी आजारांवर अचूक असे उपचार केले जाणार आहेत.

सदरच्या हॉस्पीटलमध्ये १२ बेडचे सुसज्ञ आयसीयु., २ डी इको., व्हेंटिलेटर आणि सेंट्रल ऑक्सीजन, एक्स-रे, आपतकालीन विभाग (इमर्जन्सी), ऑपरेशन थिएटर, डिलक्स रूम्स, जनरल वॉर्ड, २४ बाय सात चे मेडिकल, पॅथॉलॉजी लॅब आदी सोयी उपलब्ध आहेत. सदर हॉस्पीटल मध्ये २४ तास सेवा उपलब्ध राहणार आहे.

उत्कृष्ट कामगिरीबद्दल करमाळ्यात पोलीस पाटलांचा सत्कार

करमाळा(सं.प्र.): करमाळा शहरात पोलीस पाटील दिन साजरा करण्यात आला. यावेळी नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत करमाळा पोलीस ठाणे हद्दीतील गावामधील पोलीस पाटील यांनी उत्कृष्टपणे कामकाज केले होते. त्यामुळे पोलीस पाटील दिनानिमित्त त्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांचे मार्गदर्शक तत्वानूसार करण्यात आले.

जागा विकणे आहे

करमाळा शहरातील भवानीपेठेतील रोडटच असलेली (३८ X १६७) एकूण ६३५० स्क्वे.फूट जागा योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे.

संपर्क : मो.8888400555

डॉ.जांभळे इमर्जींग सेंटर अ‍ॅन्ड पॅथॉलॉझी लॅब
बसस्टॅन्ड समोर, नौशाद कोल्ड्रींक्सच्या वर पहिला मजला, करमाळा.

पाहिजेत

- **सोनोग्राफी रिसीपनिस्ट (महिला)**
- **नाईट ड्युटी** (D.M.L.T. अनुभवी, लॅब टेक्नीशियन)

तरी इच्छुक मुले/मुली यांनी पगाराच्या अपेक्षेसह त्वरीत वरील पत्त्यावर किंवा मोबाईलवर संपर्क करावा..!

संपर्क : मो.नं.9021909262

करमाळा लोकअदालतमध्ये २५१ प्रकरणे निकाली

करमाळा(सं.प्र.) : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तसेच करमाळा तालुका विधी सेवा समिती व तालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लोकअदालतमध्ये २५१ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यावेळी वरीष्ठ स्तर न्यायाधीश एम.पी.एखे, कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश एस.पी.कुलकर्णी, तसेच वकील संघाचे अध्यक्ष ॲड.आर.ए.बरडे, उपाध्यक्ष ॲड.एस.ए.रोकडे व इतर विधीज्ञ उपस्थित होते. या लोक अदालत मध्ये १८३३ प्रकरणे ठेवण्यात आले होते त्यापैकी २५१ प्रकरणे निकाली काढण्यात आली . यात ७ कोटी ५ लाख ५९ हजार ९०४ रूपयांची रक्कम वसुली करण्यात आली आहे.

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
fastrack
- सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

श्री गजानन अगरबत्ती
- सुगंधी अगरबत्ती ● कापूर
- अत्तर ● धूप ● भीमसेन कापूर,
- विविध कलरची रांगोळी
- सर्व प्रकारचे लोबन,
- सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !
पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

मस्कर ॲग्रो सर्व्हिसेस
व
सर्व सेवा केंद्र
मस्कर ट्रेडिंग कंपनी
आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड
धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर,
प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.
बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558

सहा नवीन विद्युत ट्रान्सफार्मरसाठी निधी मंजूर

करमाळा(सं.प्र.) : तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिफारशीनूसार करमाळा तालुक्यात सहा ठिकाणी नवीन ट्रान्सफार्मर मंजूर झाले असून त्यासाठी ३५ लाख रूपये निधी मंजूर झाला आहे. यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या विजेचा प्रश्न सुटणार आहे; अशी माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी दिली. कमलादेवी औद्योगिक सहकारी वसाहतीमध्ये विद्युत दाब कमी असल्यामुळे उद्योगांना अडचणी येत होत्या. येथे नवीन २०० चा ट्रान्सफार्मर बसवण्यासाठी ९ लाख रूपयांचा निधी मंजूर झाला आहे. वाशिंबे येथील गायकवाड अण्णा वस्तीवर नवीन ट्रान्सफार्मर होण्यासाठी ४ लाख ४८ हजार रूपये. झरे येथील संतोष घाडगे वस्तीवर ४ लाख ९९ हजार रूपये, करंजे येथील काळे ग्रुप ट्रान्सफार्मरसाठी ५ लाख ७३ हजार रूपये, करंजे येथील फुके ग्रुपसाठी ५ लाख ५१ हजार रूपये, जिंती येथील रणदिवे ग्रुप नवीन ट्रान्सफार्मरसाठी ६ लाख ८७ हजार रूपये निधी मंजूर झाला असून याला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. माजी खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांच्या प्रयत्नातून भागात २५ हायमास्ट दिवे मंजूर झाले आहेत. चिवटे म्हणाले, की अनेक ठिकाणी ट्रान्सफार्मर क्षमतेपेक्षा जास्त वीज कनेक्शन झाल्यामुळे ट्रान्सफार्मर जळतात व शेतकऱ्यांना पुरेशा त्या दाबाने वीज मिळत नाही. यामुळे ज्या ठिकाणी आवश्यक असतील तेथे ट्रान्सफार्मर क्षमता वाढवण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद सकारात्मक असून ट्रानफार्मरच्या क्षमतेत वाढ करण्यासाठी शिवसेना प्रयत्न करेल; असे सांगितले.

संस्कार सिटी फेज २
धर्मसंगीत लॉन्स शेजारी, करमाळा-कर्जत रोड
किंमत 3,51,000.00/- 1000 स्क्वे.फुट पासून आजच साईट व्हीजीट करा
४ एकरचा भव्य टाऊनशिप प्रकल्प
प्लॉट्स बुकींग सुरू आहे
वैशिष्टे
- सुरूवातीला २१ प्लॉट बुकींग करणाऱ्यांस टूनवाल कंपनीची इलेक्ट्रीक स्कुटर फ्री
- अतिशय वाजवी दरामध्ये संपूर्ण वास्तुशास्त्रानूसार ७५० ते १५०० स्क्वे.फुट प्लॉट्स उपलब्ध
- क्लिअर टायटल एन.ए.प्लॉट्स । स्वतंत्र सातबारा उतारा
- प्रशस्त अंतर्गत ३० व ४० फुटी रस्ते
- अद्ययावत अंडरग्राउंड ड्रेनेज लाईन
- स्ट्रीट लाईट्स व भव्य आकर्षक प्रवेशद्वार
- रस्त्याच्या दुतर्फी हिरवीगार झाडी
- गार्डन सभोवताली कंपाऊंड व झाडी
त्वरा करा..,
मोजकेच प्लॉट शिल्लक

TO KARMALA
TO KARJAT
30.00 M.WIDE ROAD
12.00 M.W. SERVICE ROAD
9.00 M.WIDE ROAD
15.00 M.WIDE ROAD
OPEN SPACE / GARDEN
AMENITY SPACE
ADL LAYOUT APPROVED
LAYOUT PLAN
SCALE : 1: 500
N

बुकींगसाठी संपर्क
आतार डेव्हलपर्स
फंडगल्ली, करमाळा., जि.सोलापूर
◆
आतार कलेक्शन & फुटवेअर
फंडगल्ली, करमाळा., जि.सोलापूर
जावेद आतार (9423334210)/मुन्नाभाई काझी (9881089582)

एसटी बसमधून सव्वातीन लाखाची चोरी

चार महिन्यानंतर गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : साडे येथील महिला पुणे येथे राहत असून, करमाळ्याहून परांड्याला जाणाऱ्या बसमध्ये बसली असता, पर्समधील ३ लाख २० हजाराचे दागिणे चोरट्यांनी लंपास केले. हा प्रकार १८ ऑगस्ट २०२४ ला दुपारी साडेबारा वाजता घडला आहे. या गुन्ह्याची तब्बल चार महिन्यानंतर फिर्याद दाखल झाली आहे. या प्रकरणी पल्लवी सचिन लोंढे (रा.साडे, ह.रा.मांजरी बुद्रूक पुणे) या महिलेने फिर्याद दिली आहे. त्यात तिने म्हटले आहे, की १८ ऑगस्ट २०२४ ला रक्षाबंधनासाठी मी हिवरे गावाकडे जाण्याकरीता पुणे येथून सकाळी साडेसात वाजता निघाले. करमाळा बसस्थानकावर बारा वाजता उतरले. त्यानंतर साडेबाराच्या सुमारास करमाळ्याहून हिवरे येथे जाण्यासाठी परांडा गाडीत बसले असता गर्दीत चोरट्यांनी नेकलेस, मिनी गंठन , झुमके, दोन वेल व मन्याचा गंठन ३लाख २० हजार रूपये किंमतीचा ७० ग्रॅम सोन्याचे दागिणे चोरट्यांनी लंपास केले आहेत. यात पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

श्रीदेवीचामाळ येथून १७ वर्षाच्या मुलीस पळवून नेले

करमाळा(सं.प्र.) : मावशीकडे राहण्यास आलेल्या १७ वर्षाच्या मुलीस पळवून नेले आहे. हा प्रकार १६ डिसेंबरला दिवसा घडला आहे.

या प्रकरणी मुलीच्या आईने करमाळा पोलीसात फिर्याद दिली आहे. त्यात तिने म्हटले आहे, की माझी मुलगी माझ्या बहिणीकडे श्रीदेवीच्यामाळावर गेली होती. ती १६ डिसेंबरला सकाळी आठ वाजता बाहेर गेली ती संध्याकाळी सहा पर्यंत परत आली नाही. तसेच शोध घेवूनही सापडली नाही. त्यामुळे तिला कोणीतरी पळवून नेले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

शासकीय जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्या विरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : उजनी जलाशयात संपादीत झालेल्या जमिनीत विहिर पाडून अतिक्रमण करणाऱ्या विरूध्द करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

या प्रकरणी सहाय्यक अभियंता श्रध्दा मगदूम यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की गोयेगाव येथील जमीन गट नं.८४ व ८५ मध्ये दगडू कांबळे, मच्छिंद्र कांबळे, दिगंबर कांबळे (सर्व रा.वाशिंबे) यांनी अतिक्रमण करून विहिर पाडून भराव टाकलेला आहे. यात पोलीसांनी या सर्वांच्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

करमाळा शहरात मटका घेणाऱ्यावर कारवाई

करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरात केत्तूर नाक्यावर मटक्याचे आकडे घेणाऱ्या तरूणाविरूध्द करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार १७ डिसेंबरला सायंकाळी सव्वाचारच्या सुमारास घडला आहे.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल रविराज धोंडिराम गुटाळ यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की आम्हास बातमीदारा मार्फत बातमी कळल्यावर केत्तूर नाक्यावर गेलो असता राकेश राजू अडसुळ (रा.साठेनगर , करमाळा) हा मटक्याचे आकडे घेताना आढळून आला. त्याच्याकडून पांढऱ्या रंगाचे स्लीप बुक, निळ्या शाईचा बॉलपेन व ७४० रूपये रोख जप्त केले आहेत. याप्रमाणेच पोथरनाक्यावर मटक्याचे आकडे घेणाऱ्या दिपक पितांबर केंदळे यालाही मटक्याचे आकडे घेताना पकडले असून त्याच्याकडून पांढरे बुक, निळ्या शाईचा पेन व ६५० रूपये रोख जप्त केले आहेत.



शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!
चिवटे उपहारगृह

साऊथ इंडियन: इडली सांबर, उडीदवडा सांबर, उत्तप्पा, डोसा
नाष्टा: पुरी भाजी, मिसळ पाव, पोहे/उपमा, दहीवडा/शिरा
स्नॅक्स: पावभाजी, तवापुलाव, सँडविच, फिंगर चिप्स
चाट: पाणीपुरी, स्पे.भेळ, रगडा पॅटिस, राज कचोरी
स्विट: पेढा, बर्फी, लाडू, जामून, मैसुरपाक, काजू कतली
नमकिन: फरसान, शेव, स्पे.चिवडा, पापडी
डेअरी: दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी
कोल्ड्रींक: कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम

साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.
एकवेळ अवश्य भेट द्या..!
राशिनपेठ, करमाळा. मो.८८८८१४७००५

गजकर्ण
सोरायसिस
पिंपल्स
चाई
कोंडा
वांग

करमाळा व परिसरातील त्वचा रूग्णांच्या सेवेसाठी
सोलापूर येथील त्वचारोग तज्ञ
डॉ.संकेत मंडलेचा MBBS, DDV (Pune)
प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शुक्रवारी सकाळी १० ते दु. २ पर्यंत

त्वचा विकार : नायटा/गजकर्ण, इसब, खरूज, काळे डाग, सोरायसिस, पिंपल्स्, चाई, कोंडा, स्ट्रेचमार्क, केस गळती, जुनाट खाज, ॲलर्जी, अतिरिक्त घाम येणे, वांग, नागिण, कांजण्या,नखांचे आजार, सुरमा इ.आजारांवर खात्रीशीर उपचार व सल्ला

संपर्क : डॉ.सारंगकर डेंटल क्लिनिक
करमाळा-जेऊर रोड, कॉटेज हॉस्पिटल समोर, करमाळा., जि.सोलापूर
अपॉईंटमेंट : मो.9423333904

विवाहितेचा विनयभंग करणाऱ्या विरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : विवाहितेचा विनयभंग करणाऱ्या विरूध्द करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी ३४ वर्षाच्या महिलेने फिर्याद दिली आहे. त्यात तिने म्हटले आहे, की १५ डिसेंबरला दुपारी साडेबारा वाजता केळीच्या शेतात घडाची कमळे काढत असताना उदयसिंह झोळ हा आला व त्याने माझा विनयभंग केला आहे. या प्रकरणी त्यास विरोध केला असता, त्याने लाथाबुक्क्यांनी व ऊसाने मारहाण करून जखमी केले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

अपघातात महिला ठार

करमाळा(सं.प्र.): अहमदनगर ते टेंभूर्णी महामार्गावर कविटगाव येथे सकाळी झालेल्या भीषण अपघातात एक महिला ठार झाली असून दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. सदरच्या अपघातात जेऊर येथील वाघमोडे कुटूंबिय जात असताना रस्त्यात उभा असलेल्या मालट्रक सोबत अपघात झाला. मयत ही महिला पोलीस कर्मचाऱ्याची बहिण आहे तर भाऊ व आई जखमी आहेत.

पोलीस कर्मचारी कुटूंबिय कंदरच्या दिशेने जात असताना सकाळी सहाच्या सुमारास रस्त्यात उभा असलेल्या आयशरला धडक झाल्याने त्यामध्ये शारदा वाघमोडे या मयत झाल्या आहेत. तर दोघेजण जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी बाहेरील रूग्णालयात पाठवले आहे. सदरच्या घटनेची करमाळा पोलीसात नोंद झाली असून पुढील तपास सुरू आहे.

आळजापूर येथे गोठा जळून आर्थिक नुकसान

करमाळा(सं.प्र.) : पूर्ववैमनस्यातून पेट्रोल ओतून आग लावल्याने जनावरांचा गोठा आणि इतर शेतीचे साहित्य जळून सुमारे ५ ते ६ लाखाचे नुकसान झाले आहे. हा प्रकार आळजापूर येथे रविवारी पहाटेच्या सुमारास घडला आहे.

याबाबत राजेंद्र अशोक रोडे (रा.आळजापूर) या शेतकऱ्याने करमाळा पोलिसात नुकतीच फिर्याद दाखल केली. ते रात्री नेहमीप्रमाणे घरात झोपले होते. पहाटेला धूरकट असा वास आल्याने मी जागा होऊन पाहणी केली तेव्हा जनावरांच्या गोठ्याला कोणीतरी आग लावल्याचे निदर्शनास आले. यामध्ये गोठा आणि त्यातील इतर पीव्हीसीचे साहित्य जळून सुमारे ५ ते ६ लाखाचे नुकसान झाले आहे.

प्लॉट विकणे आहे
नागोबा मंदिराजवळील हिवरवाडी रोडटच साडेचार गुंठ्याचा प्लॉट योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
संपर्क : 9011355389

तालुकास्तरीय बुध्दीबळ स्पर्धेत आकांक्षा क्षीरसागर प्रथम

श्री शिवाजी प्राथमिक विद्यामंदीर व राजाभाऊ तळेकर विद्यालय, केम.

करमाळा(सं.प्र.) : सोलापूर जिल्हा परिषद अंतर्गत नुकत्याच झालेल्या करमाळा तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेत मुली मोठा गट बुध्दीबळ या क्रिडा प्रकारात जि.प.शाळा पोफळजची विद्यार्थीनी आकांक्षा तानाजी क्षीरसागर हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशाने तिची जिल्हास्तरीय बुध्दीबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. नियमित सराव घेत आदर्श शिक्षिका रेखा शिंदे-साळुंके यांनी आकांक्षाला मार्गदर्शन केले. चिखलठाणच्या केंद्रप्रमुख वंदना पांडव यांनी आकांक्षाला रोख रकमेचे बक्षीस देऊन तिचा गौरव केला. गटशिक्षणाधिकारी, जयवंत नलवडे, यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, विस्तार अधिकारी नितीन कदम, सरपंच कल्याण पवार, माजी सरपंच दत्तात्रय गव्हाणे, उपसरपंच राणी गव्हाणे, व्यावसायिक बिभिषण गव्हाणे, चिखलठाण केंद्रप्रमुख वंदना पांडव, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राहुल धुमाळ, दत्तात्रय पवार, मारूती पवार, मेजर सचिन पवार, अरूण पवार, अक्षय कुलकर्णी, उत्तरेश्वर कांबळे, विस्तार अधिकारी मिनीनाथ टकले, माजी केंद्रप्रमुख भारत पांडव, केंद्रप्रमुख वैशाली महाजन, रमाकांत गटकळ, लक्ष्मण भंडारे, आदिनाथ देवकाते, साईनाथ देवकर, संजय मुंडे , सचित शिंदे यांनी तिचे अभिनंदन केले.

प्रवेश!
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे संचलित
सरकारमान्य
अशोक कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट
इंग्रजी : (३०-४०) मराठी : (३०-४०) हिंदी : (३०-४०)
टायपिंग क्लाससाठी प्रवेश देणे सुरू आहे
किल्ला विभाग, करमाळा. मो.८०८७९०५०८५

सरपडोह शाळेच्या खो-खो संघाची जिल्हास्तरावर निवड

करमाळा(सं.प्र.): जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सरपडोह या शाळेच्या खो-खो (मुले-मोठा गट) संघाने तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. केम येथे झालेल्या स्पर्धेत कर्णधार सोहम भिताडे व उपकर्णधार विशंभू पवार यांनी चमकदार कामगिरी करून रावगाव व कुंभेज च्या संघाचा पराभव केला. विजयी संघाला विजेतेपदाची ट्रॉफी व प्रमाणपत्र विस्तार अधिकारी कदम व मान्यवर यांचे हस्ते देण्यात आले.

प्लॉट विकणे आहे
करमाळा शहरातील नगरपरिषद हद्दीतील तहसील एन.ए. प्लॉट
(गट क्र.२९४/१/अ/२) २१ गुंठे, चारही बाजूने जाळीचे कुंपण असलेला
बंदीस्त व स्वतंत्र सातबारा असलेला रिकामा प्लॉट योग्य किंमत
आल्यास त्वरीत विकणे आहे
पत्ता : गिरधरदास देवी विद्यालय समोर, माने वस्तीमध्ये, पुणे रोड, करमाळा.
संपर्क : शिंदे (८०८७७१८३१७), काळे (९८५०९०७००१)

लग्न बस्त्याचे
विश्वसनीय वस्त्रदालन..
प्रोप्रा : भावेश नवले
मो.9960080750, 7756066330
भावेश कलेक्शन
नवीन फ्रेश स्टॉकमध्ये
५ साड्यांच्या खरेदीवर
त्याच किंमतीची १ साडी फ्री..
लग्न बस्त्यावर विशेष सुट
फॅशन डिझायनर साड्या
किड्स ड्रेस - थ्री पीस व शेरवानी ड्रेस
कटपीस - शर्ट व पॅन्ट (रेमंड, सियाराम कंपनीचे)
वुलन ड्रेस - जॅकेट, स्वेटर, हुडी
एकवेळ अवश्य भेट द्या..!
पत्ता : गायकवाड चौक, कॉलेज रोड, महेंद्रनगर, करमाळा., जि.सोलापूर.

करमाळा शहरातील नामांकित
चिवटे मिठाईवाले
यांच्या फर्मचे

चिवटे

स्विट्स & बेकर्स

भव्य
उद्घाटन सोहळा
बुधवार, दि.२५/१२/२०२४
सकाळी ११.००

चव आहे लय भारी..
बनमस्का पाव व चहा खारी

100%
pure veg

प्रत्येक आनंदी क्षणासाठी 'चिवटे'चा
सुप्रसिध्द पेढा

चविष्ट आणि परवडणारा..
आईस केक (फक्त २५० रू. मध्ये)

- खारी, टोस्ट, बटर
- नानकेट
- सर्व प्रकारचे बिस्कीट
- स्पेशल रोट
- मिल्क ब्रेड
- लादी पाव

मिळण्याचे एकमेव ठिकाण..!

सर्व **मिठाई** व **बेकरी** प्रॉडक्ट
ऑर्डरनूसार तयार करून मिळतील..!
एकवेळ अवश्य भेट द्या..!

- **संजय चिवटे(9423326594)**
- **दुर्गेश चिवटे (8421340206)**

पत्ता : राशिनपेठ, करमाळा., जि.सोलापूर.

कै.युवराज(धनुभैय्या) सुरेश किरवे

सगळे म्हणतात की..,
एक मित्र गेल्याने दुनिया संपत नाही
आणि ती थांबतही नाही..!
पण.., हे कोणालाच कसे समजत नाही की,
लाख मित्र असलेतरी
त्यात एकाची कमी कधी पूर्ण होऊ शकत नाही..!

आमच्या मंडळाचे सदस्य
कै.युवराज(धनुभैय्या) सुरेश किरवे
यांच्या आत्म्यास ईश्वर चिरशांती देवो; हीच आमची
भावपूर्ण श्रध्दांजली !

शोकाकुल
राशिनपेठ तरूण सेवा मंडळ, करमाळा.

श्वेता
गिफ्ट & टॉईज

आपल्या लाडक्या
मुला–मुलींच्या वाढदिवसानिमित्त
आकर्षक रिमोट कंट्रोल इलेक्ट्रीक थार (जीप) भेट द्या !
दि.३१ डिसेंबर पर्यंत डिस्काऊंट ऑफरचा लाभ घ्या..!

पत्ता : श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा.
(9822058106, 7798307085)